# बृहन्मुंबई महानगरपालिका
## घन कचरा व्यवस्थापन, पी/दक्षिण

# <u>सूचना</u>

विषय: पी/दक्षिण विभागात 'मोटर लोडींग' योजना राबविण्याबाबत.

**पी/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय हद्दीतील संस्थांना** याद्वारे सुचित करण्यात येते की, **दि. 01 जुलै, 2024 ते दि. 30 नोव्हेंबर, 2024** या पुढील **05 महिन्याच्या** कालावधीकरीता 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन **दि. 02 जुलै, 2024 ते दि. 30 नोव्हेंबर, 2024** कालावधीसाठी साफसफाईच्या कामाकरीता वरील विषयांस नमूद करण्यात आलेल्या योजनांतर्गत कामगार / स्वयंसेवक पुरविण्याकरीता मोहरबंद इच्छापत्र मागवित आहोत. पी/दक्षिण विभागातील संस्थाकडून दि. 21 जून, 2024 पर्यंत पर्याप्त अर्ज प्राप्त न झाल्यास परिमंडळीय-04 क्षेत्रातील इतर प्रभागातील (के/पश्चिम व पी/उत्तर) संस्थांचे अर्ज दि. 22 जून, 2024 ते 24 जून, 2024 रोजी स्विकारण्यात येतील.

अर्ज तसेच योजनेच्या अटी व शर्ती सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण विभाग ह्यांच्या कार्यालयात निशुल्क उपलब्ध असून त्या दि. 19 जून, 2024 ते 24 जून, 2024 पर्यंत सकाळी 11:00 ते दुपारी 04:00 वाजेपर्यंत घेऊ शकता. अर्ज भरताना सोबत छाननी शुल्क रु. 3300/- अधिक 18% जीएसटी इतके रोखीने नागरीक सुविधा केंद्रामध्ये भरलेल्याची पावती जोडणे अनिवार्य आहे. इच्छूक अशासकीय संस्थांनी आपले अर्ज सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण यांच्या कार्यालयात दि. 25 जून, 2024 दुपारी 02:00 वाजेपर्यंत सादर करावेत. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधीनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाही.

योजनेच्या अटी व शर्ती नुसार पात्र ठरलेल्या संस्थांपैकी 19 संस्थांची दि. 28 जून, 2024 रोजी दुपारी 04:00 वाजता **सोडत पद्धतीने** सदर कामाकरीता निवड करुन कामाची संधी देण्यात येईल. सदर सोडतीस पात्र संस्थांच्या अध्यक्षांस / सचिवास / खजिनदार पैकी कोणत्याही एकास त्यांच्या ओळखपत्रासहीत उपस्थित रहाणे **बंधनकारक** असेल. सोडतीबाबत सर्व अधिकार महानगरपालिका राखून ठेवत आहे.

सही/-18/06/2024

**सहाय्यक आयुक्त (पी/दक्षिण)**